"स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, मानव विज्ञान विद्याशाखेत पीएच.डी

(अर्थशास्त्र) पदवीसाठी सादर करण्यात येणारा शोधप्रबंधाचा आराखडा "

: **संशोधनाचा विषय** :

नांदेड जिल्हयातील नगरपालिकेचा आर्थिक अभ्यास

(कालावधी 2010-11 ते 2020-21)

-:**संशोधक** :-

घटकार एस.एस

(एम.ए.,बी.एड्., एम.फील)

-:**मार्गदर्शक** :-

प्रा.डॉ.एस.एम.मुंडकर

(एम.ए.एम.फील., पीएच.डी)

सहयोगी प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग प्रमुख

संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट, ता.जळकोट जि.लातूर

संशोधन केंद्र

सामाजिक शास्त्रे संकुल

स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

पिन कोड-431606

<u>अनुक्रमणिका</u>

1.1. प्रस्तावना

1.2. संशोधन विषयाचे महत्व

1.3. संशोधन विषयाची निवड

1.4. संशोधनाची उद्दीष्टये

1.5. संशोधनाची गृहितकृत्ये

1.6. सामुग्री संग्रहण

1.7. संशोधनाची व्याप्ती

1.8. संशोधन विषयांच्या प्रकरणांची रुपरेषा

1.9. संदर्भग्रंथ सूची

1.1 **प्रस्तावना** :-

स्थानिक स्वराज्य संस्थाचा अभ्यास करत असताना आपल्याला त्यांचे अस्तित्व ग्रामीण व शहरी अशा दोन्ही पातळयावर असल्याचे आढळते. शहरासाठी स्वतंत्र प्रशासन व्यवस्था प्राचीन कालखंडातही अस्तिवात असल्याचे दिसून येते. सर्वसाधारणपणे कोणत्याही देशात व्यापार, उद्योगधंदे, राजकरण व प्रशासन या संबंधी शहराचे महत्व मान्य केले जाते. प्रत्येक शहरात राहणाऱ्या नागरिकांचे काही विवक्षित स्थानिक स्वरुपाचे प्रश्न असतात. व त्यांचे निराकारण त्यांच पातळीवर करणे आवश्यक असते. सरकारी खाते किंवा अधिक व्यापक भौगोलिक क्षेत्र असणाऱ्या ग्रामीण स्थानिक संस्था शहराचे प्रश्न सोडवण्यासा उपयुक्त नसतात. म्हणून स्वंतत्र शहरी प्रशसनाचे महत्व मान्य करावे लागते.

आधुनिक काळात औद्योगिकीकरणाची जी प्रक्रिया झपाटयाने सुरु झालेली आहे. तिचाच शहरीकरण किंवा नागरीकरण हा परिणाम आहे. औद्योगिकीकरण व नागरीकरण या दोन्ही अविभाज्य घटक आहेत. ज्या प्रमाणे शेती व्यवसायामुळे ग्रामीण क्षेत्र (खेडी) निर्माण झाली. त्याचप्रमाणे औद्योगिकीकरणाच्या वाढीमुळे शहरे किंवा मोठया गावाचे वसाहाती निर्माण होऊ लागल्या विकासाच्या प्रक्रियेचा शहरीकरण हा महत्वाचा भाग आहे. आर्थिक दृष्टया विकसनशील राष्ट्रात शहरीकरणाची प्रक्रिया झपाटयाने सुरु आहे. तिचा वेग विकसित राष्ट्रातील शहरीकरणापेक्षा निश्चितच अधिक आहे. स्वाभाविकपणे या संदर्भात निर्माण होणाऱ्या प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी नागरी प्रशासनाचे महत्व दिवसेंदिवस वाढत आहे. म्हणून या प्रस्तुत प्रकरणामध्ये नगरपालिकेचे कार्य व त्यांचे व्यवस्थापनाचा अभ्यास केला जाणार आहे.

1.2. **संशोधन विषयाचे महत्व** :

प्रस्तुत संशोधन विषय " नांदेड जिल्हयातील नगरपालिकेचा आर्थिक अभ्यास " हा आहे. या संशोधनाविषयीचे महत्व लक्षात घेता लोकसंख्या वाढीबरोबर रोजगार उत्पन्न मिळविण्याचे उद्देशाने नागरीकरणात दिवसेंदिवस वाढ होत आहे. शहरातील औद्योगिकीकरण मोठया प्रमाणत होत असल्यामुळे आर्थिक विकासाचा वेग झपाटयाने वाढत चाललेला आहे. त्याच बरोबर नगरपरिषदेचा उत्तरदायित्वात व कार्यात वाढ होत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थेतील अत्यंत महत्वाच्या नागरी घटक म्हणजे नगरपरिषद होय. नगरपरिषदांमधील सोयी-सुविधा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून नगरपरिषदेची नागरी क्षेत्रामध्ये महत्वपूर्ण भूमिका असते. त्यासाठी नगरपरिषदेचा चिकित्सक अभ्यास करणे व त्यांच्या प्रशासनातील आणि उत्पन्न व खर्च तांळेबंदातील समस्याचा उलगडा करुन नगरपरिषेदला शिफारशी सूचवून त्यांतील अडचणी दूर करण्यास मदत होईल.

नगरपरिषेदतील मुख्यधिकारी हा प्रशासकीय अधिकारी असतो. या प्रशासकीय अधिकाऱ्याचे नागरी क्षेत्रामध्ये राबवण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना मध्ये कशा प्रकारचा सहभाग असतो, या दृष्टीकोनातून विषयाचे महत्व लक्षात येते. या बरोबरच नगरांच्या विकासासाठी लोकशाही पध्दतीने प्रत्येक प्रभागातून एका नगरसेवकाची निवड करण्यात येते. नगरसेवकांमधूनच प्रशासकीय अधिकाऱ्याबरोबर लोकप्रतिनिधी म्हणून नगरअध्यक्षाची निवड केली जाते. या सर्व घटकाद्वारे नगराचा विकास करण्यासाठी प्रत्यन होत असतो. परंतु नगराच्या समस्या खूपच खर्चिक असतात. त्यात शुध्दजलपेय, स्वच्छता, रस्तेबांधणी, उद्याने, वाचनालय, शिक्षण, मलनिस्साराण इत्यादी खर्चीक बाबी येतात. उत्पनातील घटकांमध्ये कर उत्पन्न व करेत्तर उत्पनाचा समावेश होतो यासर्व घटकांमध्ये समतोल राखून विकास साध्या करण्याचा प्रयत्न प्रशासकडून केला जातो. महत्तम समाधान मिळवून देण्याच्या उद्देशाने नगरपरिषद कार्यरत राहते. त्याचबरोबर सामाजिक कल्याण करण्यासाठी नगरपरिषद किती प्रमाणात लोककल्यासाठी हितकारक आहे किंवा नाही हे जाणून घेण्यासाठी संशोधकाचा उद्देश डोळयासमोर असल्यामुळे या विषयाचे महत्व निदर्शनास येण्यास मदत होते.

1.3. **विषय निवडीची गरज** :

भारताच्या आर्थिक विकासामध्ये वाढ होत आहे. या आर्थिक विकासाच्या वाढीबरोबर मोठया प्रमाणात नागरीकरणामध्ये वाढ होत आहे. खेडयातील बेरोजगार रोजगारासाठी नागरी क्षेत्राकडे वळत आहे व मोठया प्रमाणत नागरीक्षेत्रामध्ये विकासाचया समस्या भेडसावत आहेत. या वाढत्या नागरीकरणामुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या जबाबदारी मोठया प्रमाणात वाढ होत आहे. परंतू या वाढत्या जबाबदारी नुसार वित्तीय स्त्रोतांच्या वाढी अभावी नगरपरिषदा कार्ये करण्यास असमर्थ इरत आहेत. भारतीय लोकशाही प्रशिक्षणाच्या स्तरावर स्थानिक स्वराज्य संस्थाच्या भूमिका व महत्वाविषयी लक्ष देऊ शकतले नाही. वर्तमान इतिहास विशेषत्वाने सांगतो तो स्थानिक स्वराज्य

संस्थाची शक्ती यशस्वी व स्थिर लोकशाही प्रदन करण्यास साहयाभूत ठरते. स्थानिक स्वराज्य संस्थाचे महत्व विशद करताना माजी पंतप्रधान पंडित ज. नेहरु यांनी " स्थानिक स्वराज्य संस्था ही लोकशाहीची पहिली पाठशाला आहे." असे स्थानिक स्वराज्य संस्थेविषयी आपले मत व्यक्त केले आहे. म्हणून या महत्वपूर्ण घटकाकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

लोकशाही शासन व्यवस्थेत स्थानिक स्वराज्य संस्थेमुळे सत्तेचे विकेंद्रीकरण होते. कारण स्थानिक स्वराज्य संस्था अशा प्रकारची आदर्श संस्था आहे की, ज्याद्वारे शेवटच्या लहान घटकांपर्यंत विकासाची फळे पोहचविता येतात. सन 1991 ते 2001 या कालवधीमध्ये महाराष्ट्र राज्यातील नागरी लोकसंख्या वाढीचा दर 34.31 टक्के होता. तर 2001 ते 2007 या कालावधी पर्यंत लोकसंख्या वाढीचा दर 42.40 टक्के आहे. म्हणजेच दिवसेंदिवस नागरी लोकसंख्येत वाढ होत आहे. महाराष्ट्रातील समाजिक स्वास्थ्य व सुरक्षा, आरोग्य, पाणीपुरवठा व पर्यावरणाचा प्रश्न उपस्थित झाले आहे. इत्यादी समस्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्य व जबाबदारी भर टाकत आहे. परंतू तूलनेत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडे उपलब्ध असणारे उत्पन्नाची साधणे व कर्मचारी वर्ग इत्यादीचा तुटवडा निर्माण झाला आहे. या संस्थेवर कार्ये व जबाबदारीत ताण पडत आहे. म्हणून या विषयावर अभ्यासाची गरज निर्माण झाली.

1.4. **संशोधनाची उद्दिष्टये** :

नांदेड जिल्हयातील नगरपालिकेचा आर्थिक अभ्यास अभ्यासाठी खालील प्रमुख उद्दिष्टये निश्चित करण्यात आली आहेत.

1. नगरपालिकेच्या उत्पन्न प्रवृतीचा अभ्यास करणे
2. नगरपालिकेच्या खर्चाची प्रवृत्ती शोधणे
3. नगरपालिकेच्या वर्ग निहाय प्राप्त उत्पनन व खर्च प्रवृत्ती शोधणे
4. नगरपालिकेच्या विकास व विकासेत्तर खर्चाच्याप्रवृतीचा शोध घेणे
5. नगरपालिकेच्या कर व करेत्तर माध्यमाने प्राप्त उत्पन्न प्रवृतीचा शोध घेणे.

1.5 संशोधनाची गृहिते :

1. नगरपालिकेचा खर्च वाढत आहे.
2. मालमत्ता कर हा प्रगतशिल स्वरुपाचा आहे.
3. नगरपालिकेच्या करेत्तर उत्पन्नात कर उत्पन्नाच्या तूलनेत वाढ होते.
4. वाढत्या नागरीकरणामुळे नगरपालिकेच्या जबाबदारीत वाढ होते.

1.6 सामुग्री संग्रहण :

नांदेड जिल्हयातील नगरपालिकेचा आर्थिक अभ्यास करण्यासाठी प्राथमिक माहिती (Primary Data) आणि द्वितीय माहिती (Secondary Data) अशा दोन्ही सामुग्रीचा आधार घेण्यात येईल. नांदेड जिल्हयातील नगरपालिकेचा 2010-11 ते 2020-21 अभ्यास कालखंडात उत्पन्न व खर्चाचा अभ्यास करण्यासाठी नांदेड जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन निगडीत ग्रंथे, मासिके, अंक, त्रैमासिके इत्यादी माहितीसाठी आधारभूत सामुग्री म्हणून उपयोगात आणली जाईल.

1.7. संशोधनाचा कालावधी व व्याप्ती :

नांदेड जिल्हयातील मुखेड, उमरी, बिलोली, हादगाव, किनवट, कुंडलवाडी, धर्माबाद, मुदखेड, देगलूर, लोहा, कंधार, भोकर या 12 नगरपालीकांचा अभ्यासासाठी 2010-11 ते 2020-21 या दहा वर्षाच्या कालावधीची निवड करण्यात आली आहे. या कालावधीत नगरपरिषदेने विकासाची किती कार्य केली आहेत. याचा आढावा घेण्यात येईल. त्याच प्रमाणे नगपालिकेचया उत्पन्न व खर्चाच्या प्रर्वतीचा शोध घेण्यात येईल.

1.8 संशोधन पध्दती :

संशोधनाच्या एकूण चार पध्दती पैकी प्रस्तूत संशोधन विश्लेषणासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येईल. सामुग्री संकलनानंदतर त्यातील महत्वपूर्ण तथ्यांचे वर्गीकरण करुन सारणीपण करण्यात येईल. तथ्यांचे विवेचन व निर्वाचण करण्यात येईल त्यावरुन वस्तूनिष्ठ निष्कर्षाची मांडणी करण्यात येईल.

1.8 **संशोधन विषयाच्या प्रकरणांची रुपरेषा** :

प्रकरण 1 : प्रस्तावना :

प्रकरण 2 : संशोधन साहित्याचा आढवा व संशोधन पध्दती

प्रकरण 3 : नांदेड जिल्हयाची सर्व साधारण माहिती

प्रकरण 4 : नांदेड जिल्हयातील नगरपालिकेची उत्पन्नाची प्रवृत्ती

प्रकरण 5 : नांदेड जिल्हयातील नगरपालिकेची खर्चाची प्रवत्ती

प्रकरण 6 : उत्पन्न व खर्चाचा तुलनात्मक अभ्यास

प्रकरण 7 : सारांश, निष्कर्ष व शिफारशी

संदर्भ ग्रंथसूची :

1.प्रा.एखेळीकर रमेश : 'भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था' कैलास पब्लिकेशन औरंगपूरा, औरंगाबाद

2.प्रा.डॉ.नाडगोड गुरुनाथ : 'सामाजिक संशोधन पध्दती' फडके प्रकाशन कोल्हापूर -1999

3. प्रा.दर्शनकार अर्जुन : 'पंचायतराज व नगरप्रशासन'- कल्पना प्रकाशन, नांदेड तृतीय आवृत्ती जून 1999

संशोधक
घटकार एस.एस
(एम.ए.,बी.एड्., एम.फील)

मार्गदर्शक
प्रा.डॉ.एस.एम.मुंडकर
(एम.ए.एम.फील., पीएच.डी)
सहयोगी प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग प्रमुख
संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट,
ता.जळकोट जि.लातूर